आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३१ ऑक्टोबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करावं, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतिनिमित्त मान्यवरांची आदरांजली, राज्यासह देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- ‘केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं’ देशभरातल्या १ हजार ४६६ पोलिसांना जाहीर, राज्यातल्या ९ जणांचा पदक विजेत्यांमध्ये समावेश

**आणि**

- ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय फलंदाजांची हाराकिरी / ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून विजय

**<><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त गुजरातमधल्या एकता नगर इथं आयोजित राष्ट्रीय एकता दिवस समारंभात ते बोलत होते. देश कमकुवत करणाऱ्या सर्व विचार किंवा कृती प्रत्येक नागरिकानं नाकारायला हवी, ही काळाची गरज असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या दृष्टिकोनाला मूर्त रूप देत ५५०हून अधिक संस्थानं एकत्र करून अशक्य वाटणारं काम साध्य केलं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. देशभरात सुरू असलेल्या एकता दौडमध्ये कोट्यवधी भारतीयांचा उत्साह पाहून प्रधानमंत्री म्हणाले…

***होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री***

प्रधानमंत्री मोदी यांनी दिवसाची सुरुवात स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पांजली अर्पण करून केली. यावेळी त्यांनी एकता दिनाची शपथ घेतली, तसंच भव्य एकता दिन संचलनाचं निरीक्षण केलं. या संचलनामध्ये बीएसएफ, सीआरपीएफ आणि विविध राज्य पोलीस

दलांच्या तुकड्या सहभागी झाल्या होत्या. या संचलनात 'विविधतून एकता' या संकल्पनेवर आधारीत दहा चित्ररथही सहभागी झाले होते. त्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाचाही समावेश होता.

**<><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. सरदार पटेल यांनी आपल्या अढळ संकल्प, अदम्य धैर्य आणि कुशल नेतृत्वानं राष्ट्राला एकत्र आणण्याचं ऐतिहासिक कार्य केलं, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पटेल यांना आदरांजली वाहिली. संस्थानांचं विलिनीकरण आणि एकतेसाठी पटेल यांचं अमूल्य योगदान प्रेरणादायी आहे, अशा शब्दात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

देशाची अखंडता, सुशासन आणि सार्वजनिक सेवेसाठी पटेल यांची अढळ वचनबद्धता पुढच्या प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही पटेल यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><>**

नवी दिल्लीत आकाशवाणी भवन इथं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी आज 'स्वच्छता प्रतिज्ञा' या कार्यक्रमाचं नेतृत्व केलं. 'स्वछता हीच  सेवा' या अभियानाच्या पाचव्या भागातल्या विशेष मोहिमे अंतर्गत माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि त्यांच्या संस्थांच्या उपक्रमांची माहिती मुरुगन यांनी आकाशवाणी भवनाच्या बापू स्टुडिओला दिलेल्या भेटीत दिली.

**<><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात सर्वत्र एकता दौड, पदयात्रांसह विविध कार्यक्रम आयोजित केले होते. मंत्रालयात मुख्य सचिव राजेश कुमार यांनी पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार करून अभिवादन केलं. तसंच दिवंगत माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेलाही पुष्पहार अर्पण करून

अभिवादन केलं. नवी मुंबईत बेलापूर, रबाळे आणि नवी मुंबई महापालिका मुख्यालय इथं एकता दौडसह विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

<><><>

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी ‘केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं’ देशभरातल्या १ हजार ४६६ जणांना जाहीर झाली आहेत. त्यात महाराष्ट्रातल्या नऊजणांचा समावेश आहे. तपास विभागात पोलीस उपनिरीक्षक भगवान नारोडे, पल्लवी चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे, किशोर काळे, शर्मिष्ठा वालावलकर, सहायक पोलीस निरीक्षक रूपाली पोळ, श्रवण दाठ आणि विवेक पाटील यांना, तर न्यायपूरक विज्ञान विभागात अ श्रेणीचे उपसंचालक संदीप चेट्टी यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झालं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व पदक विजेत्या पोलीस कर्मचाऱ्यांचं अभिनंदन केलं आहे. त्यांना मिळालेला पुरस्कार आणखी अनेक लोकांना देश सेवेच्या मार्गावरून चालण्यासाठी प्रेरणा देईल, असं शहा यांनी म्हटलं आहे.

<><><>

भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची आज पुण्यतिथी आहे. यानिमित्त देशभरातून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आज इंदिरा गांधींच्या ‘शक्तिस्थळ’ या समाधीस्थळी जाऊन त्यांना आदरांजली वाहिली.

<><><>

मेलबर्न इथं झालेल्या दुसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर ४ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केलं. मात्र भारताच्या फलंदाजांनी अक्षरशः हाराकिरी केली. अभिषेक शर्मानं ६८ धावा केल्या. त्याखालोखाल हर्षित राणानं ३५ धावांचं योगदान दिलं. त्या व्यतिरिक्त भारताच्या इतर खेळाडूंना किमान दोन अंकी धावाही करता आल्या नाहीत. चार फलंदाज शून्यावर बाद झाले. त्यामुळे सामन्यातले ८ चेंडू बाकी असताना भारताचा डाव १२५ धावांवर आटोपला.

ऑस्ट्रेलियानं ही धावसंख्या ६ गडी गमावून सामन्यातले ४० चेंडू बाकी असताना पार केली.

अवघ्या १३ धावा देत भारताचे तीन गडी बाद करणारा ऑस्ट्रेलियाचा जॉश हेझलवूड सामनावीर ठरला.

<><><><>

आर्य समाज ही प्रखर राष्ट्रवादींची संघटना आहे, ही संघटना निर्भयपणे भारतीयतेबद्दल बोलते. लाला लजपत राय आणि राम प्रसाद बिस्मिल यांसारख्या क्रांतिकारकांना आर्य समाजापासून प्रेरणा मिळाली, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं.

दिल्लीतील आंतरराष्ट्रीय आर्य महासंमेलनात प्रधानमंत्री बोलत होते. दुर्दैवाने, राजकीय कारणांमुळे, स्वातंत्र्यलढ्यातील आर्य समाजाच्या भूमिकेला सन्मान मिळाला नाही, असं ते म्हणाले.

<><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा आणि जद(यू) यांच्या नेतृत्वाखालच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं आज पाटणा इथं जाहीरनामा प्रसिद्ध केला. भाजपचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा आणि पाचही घटक पक्षांचे वरिष्ठ नेते या वेळी उपस्थित होते.

या जाहीरनाम्यात पुढच्या पाच वर्षांत एक कोटी सरकारी नोकऱ्या आणि रोजगार निर्माण करण्याचं आश्वासन दिलं आहे. तसंच एक कोटी महिलांना लखपती दीदी बनण्यास सक्षम करण्याचं आश्वासनही सत्ताधारी आघाडीनं दिलं आहे.

रालोआच्या या जाहीरनाम्यावर जनसुराजचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी टीका केली. रालोआ आणि महाआघाडी बेरोजगारी, स्थलांतर, आरोग्यसेवा आणि शिक्षण या खऱ्या मुद्द्यांवर बोलत नाहीत, असा आरोपही प्रशांत किशोर यांनी केला.

<><><><>

येत्या २४ तासांच्या कालावधीत सिक्कीम मधे काही ठिकाणी जोरदार बर्फवृष्टी होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. या भागाला रेड अलर्ट दिला आहे. अंदमान आणि निकोबार, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, हिमालयालगत असलेला पश्चिम बंगालचा

प्रदेश, झारखंड तसंच सिक्कीममध्ये उद्यापर्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बिहार, गुजरात तसंच मध्य प्रदेशच्या पश्चिम भागातही काहीशी अशीच परिस्थिती राहील.

<><><><>

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रसिद्ध ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर झाला आहे. रोख एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असा या पुरस्काराचं स्वरूप असून त्याचं वितरण लवकरच होणार आहे. सन २०1० पासून सुरू झालेला हा पुरस्कार विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे एका अमराठी कवीला दिला जातो.

//<><><><>//